148

# गांधीवादी विचार

## GANDHIAN THOUGHTS

Volume-I




संपादक

डॉ. बाळासाहेब जी. जोगदंड

149


| | | |
|---|---|---|
| 13 | महात्मा गांधीजींचे आर्थिक विचार—एक विश्लेषण<br>प्रा.डॉ.विठ्ठल निलकंठ ठावरी | 99 |
| 14 | ग्रामीण विकासात गांधीजीच्या विचारांची प्रासंगिकता<br>डॉ. दिपाली श्रीराम घोगरे | 108 |
| 15 | महात्मा गांधीजींची रामराज्याची संकल्पना<br>अमोल भाऊराव बंड | 111 |
| 16 | भारतीय संविधानातील उद्देशपत्रिकेचा अर्थ प्रा. डॉ. जे. टी. कांबळे | 116 |
| 17 | गांधींचे राजकीय विचार डॉ विजय कृष्णराव काळे | 120 |
| 18 | जागतिक शांतता आणि महात्मा गांधी<br>प्रा.एस.बी.चव्हाणके | 132 |
| 19 | म. गांधीचे ग्रामविकास अर्थव्यवस्थेसंबंधीचे आर्थिक विचार : एक विश्लेषण<br>प्रा. डॉ. पी. डी. हुडेकर | 140 |
| 20 | महात्मा गांधींचे स्त्री सुधारणा विषयक विचार<br>प्रा. क्षीरसागर संदिप शिवाजी | 147 |
| 21 | 'महात्मा गांधींच्या सामाजिक विचारांची प्रासंगिकता'<br>प्रा. डॉ. सुनिल प्रल्हाद गायगोळ | 153 |
| 22 | महात्मा गांधींच्या सामाजिक विचारांचे ऐतिहासिक महत्त्व<br>प्रा.डॉ. विलास फरकाडे | 162 |
| 23 | महात्मा गांधींचे आर्थिक विचार : एक अभ्यास<br>प्रा. डॉ. चंद्रशेखर क्षिरसागर | 168 |
| 24 | महात्मा गांधीजीच्या सत्याग्रह विचाराचे तत्वज्ञान<br>प्रा. एस.एस. तायडे | 174 |
| 25 | गाँधी का आर्थिक चिन्तन और भारतीय अर्थव्यवस्था<br>समीर कुमार गुप्ता | 178 |
| 26 | बाजारवाद से नही बल्कि गांधी के विचारों से बदलेगी दुनियॉ।<br>डॉ. अनुपकुमार सिंह | 184 |

## ग्रामीण विकासात गांधीजीच्या विचारांची प्रासंगिकता

डॉ. दिपाली श्रीराम घोगरे
राज्यशास्त्र विभाग प्रमुख
डॉ. एच. एन. सिन्हा कला व वाणिज्य महाविद्यालय, पातुर

भारतातील सुमारे ७२ टक्के जनता ग्रामीण भागात राहत असल्याने जोपर्यंत ग्रामीण विकास होणार नाही तोपर्यंत आपण भारताच्या विकासाचा विचार करू शकत नाही आणि भारताच्या विकासाचा विचार गांधी विचाराच्या चिंतनाशिवाय पूर्ण होवू शकत नाही. कारण त्यांच्या इतका सर्वस्पर्शी विचार कोणत्याही चिंतनाने केलेला दिसत नाही. धर्म, नीती, राजकारण, समाजकारण, अर्थकारण, शिक्षण, आरोग्य, कायदा, शेती कोणतेही क्षेत्र असो, वैयक्तिक आत्मशांती पासून विश्वशांती पर्यंत, गावापासून विश्वापर्यंत प्रचंड आवाका गांधी विचारांनी व्यापला आहे आणि म्हणून भारतासाठीच नव्हे तर संपूर्ण जगासाठी गांधी विचार मार्गदर्शक आहेत.

गांधी विचारातील एक विचार म्हणजे त्यांची ग्राम "स्वराज्याची संकल्पना" जी आजच्या ग्रामविकासाकरीता अतिशय उपयोगी ठरणारी आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात परकीय राजवटीनुळे ग्रामीण समाजाची दूर्दशा झाली होती. त्यामुळे स्वातंत्र्योत्तर काळात ग्रामीण भागाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी शासनाला प्रयत्न करणे गरजेचे होते. या प्रयत्नांना दिशा दाखविण्याचे कार्य गांधी विचारांनी केले. गांधीजीनी मांडलेल्या 'ग्रामस्वराज्य' व स्वावलंबी खेडयांची संकल्पना, देशात पंचायत राजव्यवस्था आणि लोकशाही विकेंद्रीकरणास कारणीभूत ठरल्या. गांधीजीनी नेहमी पटवून दिले की, खरा भारत, खरी संस्कृती खेडयात आहे. परंतु खेडयातील जनता शहराकडे स्थलांतरीत होत आहे, खेडी ओस पडू लागले आहेत. गांधीजी म्हणाले होते की, "खेडी नष्ट झाली तर हिंदूस्थान नष्ट होईल त्यामुळे खेडयांचे पुरूज्जीवन व पुनर्रचना करणे आवश्यक आहे"- भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर घटनाकारांनी



गांधीजीच्या या विचारांचे औचित्य ओळखून ग्रामीण विकासाकरीता शासनकर्त्यांवर पंचायत राज व्यवस्था निर्माण करण्याची जबाबदारी टाकली आणि गांधी विचारांची प्रासंगिकता स्पष्ट झाली. गांधी विचार तेव्हा जेवढे प्रासंगिक होते तेवढेच ते आजही प्रासंगिक वाटतात.

गांधीजींना लोकशाही विकेंद्रीकरण तर हवेच होते, त्याचबरोबर त्यांना अर्थसत्तेचे विकेंद्रीकरणही अपेक्षित होते. म्हणून त्यांनी स्वावलंबी खेडयांची संकल्पना स्पष्ट केली. त्यांची अशी धारणा होती की, "माझ्या स्वप्नातील स्वराज्य हे गरीबांचे स्वराज्य असेल, जीवनांच्या ज्या गरजांचा उपभोग श्रीमंत घेतात, त्या सर्व गरजा गरीबांना सुलभ व्हाव्यात अशा राज्यात जाती, धर्मावर आधारीत भेदांना कोणतेच स्थान नसावे, हे स्वराज्य सर्वांच्या कल्याणासाठी असावे". राष्ट्र उभारणीत तर त्यांनी खेडयांना महत्वपूर्ण घटक मानले. खेडी जेव्हा स्वयंपूर्ण होतील, स्वावलंबी होतील तेव्हाच खऱ्या अर्थाने ग्रामीण विकास होईल. त्याकरीता गांधीजींनी मांडलेली पंचायत राज व्यवस्था आपण स्थापन केली. पंचायत राजच्या माध्यमातून ग्रामीण विकासाकरीता अनेक योजना राबविल्या जातात. त्यात कृषिविषयक योजना, रोजगार योजना, महिला विषयक योजना, ग्राम सडक योजना, सार्वजनिक आरोग्य व ग्रामीण स्वच्छता कार्यक्रम अशा विविध क्षेत्रातील योजना शासन राबवित आहे. योजनांच्या माध्यमातून ग्रामीण भागाचा काही अंशी विकास होण्यास निश्चितच हातभार लागला. परंतु ग्रामीण विकासाची यशसिध्दी झाली असे म्हणने चुकीचे ठरेल. स्वातंत्र्यानंतरच्या सहा दशकाचा आढावा घेतल्यानंतर महात्मा गांधीच्या स्वप्नातील ग्राम स्वराज्य स्थापन झाले नाही असे खेदानेच म्हणावे लागते, कारण शासनाद्वारा राबविल्या जाणाऱ्या योजना साध्याभोळ्या ग्रामीण जनतेपर्यंत पोहचतच नाहीत. त्यामुळे या योजना ग्रामीण जनतेकरीता आहेत की अधिकारी, पदाधिकाऱ्यां करीता आहेत असा संभ्रम निर्माण होतो.

ज्या उद्देशाने गांधीजींनी लोकशाही विकेंद्रीकरणाची संकल्पना मांडली त्या ग्रामविकासाविषयी पंचायत राज व्यवस्थेतील लोक प्रतिनिधी भारावलेले आहेत का? असा प्रश्न पडतो. समाजाच्या कल्याणाकरीता ग्रामीण राजकारणात वैयक्तिक स्वार्थ, जातीपातीचे राजकारण, गुन्हेगारी अशा वाईट प्रवृत्तींचो



151

घुसखोरी झाल्याने पंचायत राज व्यवस्थेची प्रतिष्ठाच धोक्यात आली आहे. सामाजिक हिंसेचे बिज समाजात जागोजागी पेरले जात आहे. ग्रामविकास आणि पर्यायाने देश विकासाकडे दूर्लक्षच होत आहे. या परिस्थितीचा फायदा घेवून भ्रष्ट राजकारणी आपली पोळी भाजून घेत आहेत. आणि ग्रामीण जनता मात्र भरडली जात आहे. हे सर्व पाहून पुन्हा आठवतात ते गांधीजी आणि त्यांचे विचार त्यांनी राजकारणात सत्य व अहिंसेची झालर लावून राज्याला नैतिक अधिष्ठान प्राप्त करून दिले होते. त्या नैतिक आधाराची आजच्या अधःपतीत समाजाला पुन्हा एकदा गरज आहे.

एकीकडे भारताला महाशक्ती बनवण्याची स्वप्न पाहतांना खेडयातून ग्रामोद्योग नाहीसे झाल्याचे त्यांच्या होत चाललेल्या ऱ्हासाकडे दूर्लक्ष करून चालणार नाही. खेडयांची दयनीय अवस्था पाहून स्वातंत्र्यपूर्व काळाजी पुनरावृत्ती होईल की काय अशी भीती वाटायला लागते आणि पुन्हा आठवतात गांधीजी, त्यांचा संदेष ष्खेडयाकडे चलाष कारण खेडयातील गरीब लोकांना परदेशी कंपन्या लुटत आहेतच त्याच बरोबर शहरवासी बांधवही लुटत आहेत. अन्नदाता स्वतः उपाशी मरतांना दिसतो. तेव्हा शासनाला परत एकदा आठवण होते गांधीप्रणीत स्वावलंबी खेडयाची. जिथे समतोल आहात, चांगली घरे, शिक्षण व आरोग्याच्या सोई गावातच असतील. त्याकरीताच शासन रोजगार हमी योजना, घरकूल योजना, बचत गट योजना यासारख्या योजना राबवत आहे. गांधीजींच्या ग्रामस्वराज्याच्या प्रेरणेतून तंटामुक्त गाव योजना, हगणदारी मुक्त गाव योजना, ग्राम स्वच्छता अभियान यासारख्या योजना आकार घेत आहेत. बचत गटाच्या माध्यमातून पुन्हा एकदा गांधी प्रणीत कुटीरोद्योग व ग्रामोद्योगाच्या उदयाची चाहूल लागली आहे. गरज आहे ती फक्त या योजना प्रामाणिकपणे राबविल्या जाण्याची. त्यासाठीही पुन्हा गांधीजींचे सत्याचे व सत्याग्रहाचे तत्वज्ञानच कामी येईल यात शंका नाही. सत्ताधारी जर जनतेला जुमानत नसतील तर सत्याग्रहाच्या मार्गाने त्यांना वठणीवर आणायचा जो मार्ग गांधीजींनी दाखवला तो भारतासाठीच नव्हे तर संपूर्ण जगाला तारणारा आहे.

एकंदर गांधीजींच्या ष्ग्राम स्वराज्यष व स्वावलंबी खेडयाविषयी विचारांचे चिंतन केल्यानंतर एक गोष्ट लक्षात येते की, महात्मा गांधीजींच्या या विचारांची प्रस्तुतता ग्रामीण विकासाकरीता नेहमीच राहणार आहे. कारण मानवाच्या सुखी जीवनाचा शोध हाच गांधी विचारांचा केंद्रबिंदू होता. त्यामुळे त्यांचे विचार ग्रामीण विकासाकरीता नेहमीच मार्गदर्शक राहतील.

# भारतीय लोकशाही

(समकालीन परिप्रेक्ष्य)

75 भारत अमृत महोत्सव

हर राह पर बढ़ते कदम

PRINCIPLES OF INDIAN DEMOCRACY

DEMOCRACY IN INDIA



संपादक

डॉ. संदीप बी. काळे

# अनुक्रमणिका



| अ.क्र. | लेख लेखक | पृ.क्र. |
|---|---|---|
| 1 | भारतीय लोकशाही व महिला सक्षमीकरण डॉ. दिपाली श्रीराम घोगरे | 1 |
| 2 | संविधानातील मार्गदर्शक तत्वासंदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा दृष्टीकोण डॉ.ए.बी.जाधव | 8 |
| 3 | शिक्षण व महिला सबलीकरण श्री पांचाळ देविदास श्रीनिवासराव | 18 |
| 4 | आधुनिक भारतीय लोकशाहीच्या वस्तुस्थितीचे अध्ययन प्रा. सि. के. भोवते | 24 |
| 5 | भारतीय संविधानाच्या प्रस्तावनेतील तत्वज्ञान प्रा. उज्वला रावसाहेब प्रधान | 32 |
| 6 | मूलभूत हक्कांचे भारतीय लोकशाहीतील महत्व देवेंद्रसिंग नरसिंग सोळंके | 42 |
| 7 | लोकशाही व मूलभूत कर्तव्य प्रा.डॉ.उमेशकुमार पी. शहारे | 59 |
| 8 | भारतीय संविधानाचे उद्देशिकेचे तत्वज्ञान'' : एक चिकित्सक अध्ययन डॉ. सुभाष दौलतराव उपाते | 67 |
| 9 | भारतीय लोकशाहीत प्रादेशिक राजकीय पक्षांची भूमिका प्रा. डॉ. दिनकर संतुकराव कळंबे | 80 |
| 10 | भारतीय संविधानातील राज्यनिती मार्गदर्शक तत्त्व प्रा. विजय गावंडे | 90 |
| 11 | आरोग्य – एक मुलभूत हक्क प्रा. डॉ. सरला वसंतराव मेश्राम | 97 |

# भारतीय लोकशाही व महिला सक्षमीकरण

डॉ. दिपाली श्रीराम घोगरे
राज्यशास्त्र विभाग प्रमुख,डॉ.एच.एन.सिन्हा महाविद्यालय,
पातूर ता.पातूर जि. अकोला

भारतातच नव्हे तर जगातील अनेक देशांमध्ये महिला ही बराच काळ दुय्यम राहीली. भारतात महिलांचे कार्यक्षेत्र 'चुल आणि मूल' सांभाळणे एवढेच आहे अशी समाजधारणा होती. स्वातंत्रपुर्व काळात अनेक समाजसुधारकांनी महिलांचे 'चुल आणि मुल' च्या चाकोरीबाहेर काढण्यासाठी तसेच त्यांच्याशी वरील जाचक रुढी–परंपरांची बंधने तोडण्यासाठी प्रयत्न केले. त्यामध्ये राजाराम मोहन राय, महात्मा ज्योतीबा फुले,सावित्रीबाई फुले, पंडीत धोंडो केशव कर्वे अशा अनेक समाजसुधरकांची नावे अगत्याने घ्यावे लागतील. महात्मा गांधीनी आपल्या स्वातंत्र चळवळीत महिलांना सहभागी करुन घेतले. त्यांची चळवळ अहिंसात्मक मार्गावर आधारीत असल्याने यामध्ये अनेक महिलांनी सहभाग घेतला. स्वातंत्रपुर्व काळात समाजसुधारकांनी महिलांच्या उथ्थानासाठी केलेले प्रयत्न हीच महिला सक्षमीकरणाची नांदी होती असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. स्वातत्र्योत्तर काळात महिलांना सक्षम करण्यासाठी विशेष प्रयत्न केले गेले,विशेषत: भारतीय राज्यघटनेत महिलांची स्थिती सुधारेल अशा अनेक तरतुदी करण्यात आल्या आहेत.

**भारतीय राज्यघटना व हिला सक्षमीकरण :**

स्वातंत्र्योत्तर काळात महिलांना सक्षमक रण्यासाठी राज्यघटनेच्या माध्यमातून अनेक पाऊले उचलली गेली. महिलांना मुलभुत अधिकार कोणताही भेदभाव न करता देण्यात आले आहेत. तसेच मार्गदर्शक तत्वांमध्ये देखील महिलांसाठी अनेक तरतुदी

[illegible] आहेत. सर्वात महत्वाचे म्हणजे सार्वत्रिक प्रौढ मताधिकारांचे तत्व स्विकारुन महिलांनी मतदानाचा हक्क व राजकारणात सहभागी होण्याचा हक्क समप्रमाणत उपलब्ध करुन देण्यात आला आहे. त्यात आणखी भर म्हणजे ७३ व्या घटनादुरुस्तीने महिलांना स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ३३ टक्के आरक्षणाची चळवळ अधिक प्रबल करण्यात आली. आता तर अनेक राज्यांनी पंचायत राजमध्ये महिलांना ५०टक्के आरक्षणाची तरतुद केली आहे.

**राज्यघटनेतील मुलभूत अधिकार व महिला सक्षमीकरण :**

भारतीय राज्यघटनेच्या तिस—या भागात कलम १२ ते ३५ मध्ये मुलभूत अधिकारांचे वर्णन केले आहे. हे मुलभूत अधिकार भारतातील सर्व नागरीकांसाठी असल्याने पुरुषांच्या बरोबरीनेच महिलांनाही हे अधिकार राज्यघटनेने बहाल केले आहेत. समतेच्या अधिकारातील तरतुदीनुसार कुठल्याही आधारावर भेदभाव न करता सर्व नागरीकांना कायद्यासमोर समान मानले जाईल. अर्थात कायद्यापुढे समतेचे तत्व स्विकारण्यात आले. असे असले तरी भारतीय समाजव्यवस्थेतील विषमता दूर करण्यासाठी मागासवर्ग व महिलांना विशेष सवलत दिल्यास तो भेदभाव न करता सर्व नागरीकांना कायद्यासमोर समान मानले जाईल. अर्थात कायद्यापुढे समतेचे तत्व स्विकारण्यात आले. असे असले तरी भारतीय समाजव्यवस्थेतील विषमता दूर करण्यासाठी मागासवर्ग व महिलांना विशेष सवलत दिल्यास तो भेदभाव मानला जाणार नाही,हा आशय या अधिकारातून स्पष्ट करण्यात आला आहे. समतेच्या अधिकाराने स्त्री—पुरुष भेदभावास बंधी करून प्रत्येकाला कामाची व विकासाची समान संधी देण्याची तरतुद केली आहे. स्वातंत्र्याच्या अधिकारातही भाषण करण्याचे स्वातंत्र्य, शांततापूर्वक नि:शस्त्र सभा घेण्याचे स्वातंत्र्य, संस्था किंवा संघटना स्थापण्याचे स्वातंत्र्य, संचार स्वातंत्र्य,



वास्तव्याचे स्वातंत्र्य व व्यवसाय करण्याचे स्वातंत्र्य ही सर्व स्वातंत्र्ये पुरुषांप्रमाणेच महिलांनाही आहेत. वरील सहा स्वातंत्र्यामुळेच स्वातंत्र्योत्तर काळात महिला सबळ होण्यास मदत झाली असून 'चुल आणि मुल या कार्यक्षेत्राच्या पलीकडे जावुन ती समाजकारण,राजकारण ,उद्योग व्यवसाय आणि नोकरीच्या क्षेत्रात सक्षमतेने आपला ठसा उमटवीत आहे.

शोषता विरुध्दचा अधिकार भारतीय राज्यघटनेने सर्व नागरीकांना प्राप्त करुन दिला आहे. या अधिकाराचाही स्त्री जातीला फार मोठा फायदा झाला आहे. समाजातील सशक्त घटक दुर्बल घटकाचे शोषण करण्याची शक्यता असते. अशा शोषणाविरुध्द शोषित व्यक्तीला न्यास देण्यासाठी हा अधिकार महत्वाचा ठरता. भारतात अनेक वर्ष स्त्रिला दुर्बल व दुय्यम मानून तिचे जे शोषण घेत होते, त्याविरुध्द आवाज उठविण्याचे बळ स्त्रिला या अधिकाराने दिले आहे. या अधिकारामुळे देवदासी पध्दती तसेच सक्तीने वेश्याव्यवसाय करण्यास भाग पाडणे, या पध्दतीवर बंधने आली आहेत. धार्मिक स्वातंत्र्याचा अधिकारही स्त्रीला स्वत:च्या इच्छेने कोणत्याही धर्माचा आचार प्रचार व प्रसार करण्यास मोकळीक देत असल्याने ती स्व:इच्छेने आध्यात्मिक प्रतिष्ठा जपू शकते. शैक्षणिक व सांस्कुतिक अधिकारामूळेही महिला सक्षमीकरणास मोठा हातभार लावलेला दिसून येतो. या अधिकारामुळे सर्व जाती धर्मातील महिलांना शिक्षण घेण्याचा अधिकार प्राप्त झाला आहे. संविधानात्मक,उपाययोजनांच्या अधिकारामुळे भारताचा नागरीक असलेली प्रत्येक महिला आपल्यावर झालेला अन्यायाविरुध्द न्यायालयात दाद मागु शकते आणि सन्मानाचे व प्रतिष्ठेचे जीवन जगू शकते.

**मार्गदर्शक तत्वे व महिला सक्षमीकरण :**

भारतीय राज्यघटनेच्या चोथ्या भागात कलम ३६ ते ५१ मध्ये राज्याच्या धोरणाच्या मार्गदर्शक तत्वांचा समावेश केला आहे. संविधानातुन काय साध्य करावयाचे आहे हे उद्‌दीष्टांच्या स्वरुपात उद्देशपत्रिकेत नमूद करण्यात आले. ही उद्‌दीष्टये साध्य करण्यासाठी राज्यकर्त्यांनी कशाप्रकारे धोरणे ठरवावी व कशाप्रकारे राज्य कारभार करावा हे सांगण्याकरीता संविधानकारांनी काही मार्गदर्शक तत्वे निश्चित केली आहेत. राज्यकर्त्यांचे धोरण ठरवावी व कशाप्रकारे राज्य कारभार करावा हे सांगण्याकरीता संविधानकारांनी काही मार्गदर्शक तत्के राज्यकर्त्यांना मार्गदर्शन करतात. या मार्गदर्शक तत्वांमध्ये काही तत्वे महिलांना सक्षम करण्यासाठी मार्गदर्शन करणारी आहेत. जसे की सब्र स्त्री–पुरुषांना समान कामासाठी समान वेतन प्राप्त होईल अशी व्यवस्था करावी. या मार्गदर्शक तत्वाने पुरुषाप्रमाणेच महिलांना समान दर्जा दिला आहे. त्यामुळे पारंपारीक समाजात स्त्रीला दुय्यम मानुन तिच्या कामासही दुय्यम म्हणण्याची प्रवृत्ती याा मार्गदर्शक तत्वांच्या अंमलबजावणीमुळे नष्ट झाली आहे. दुसरे म्हणजे मार्गदर्शक तत्वांमध्ये १४ वर्षापर्यतच्या सर्व मुला–मुलींना मोफत व सक्तीचे शिक्षण देण्याची व्यवस्था शासनाने करावी असे नमूद केल्यामुळे पुरुषांबरोबरच महिलांच्या साक्षरतेच्या प्रमाणात मोठया प्रमाणात वाढ झाली आहे. विशेषत: या मार्गदर्शक तत्वाला अनुसरुन शिक्षणाचा अधिकार मुलभूत अधिकारात स्माविष्ट करण्यात आला आहे. त्यामुळेही महिलांचे साक्षरतेचे प्रमाण वाढत आहे. भारतातील साक्षरतेचे प्रमाणे वाढविण्याकरीता स्वातंत्र्योत्तर काळात अनेक प्रयत्न करण्यात आले आणि आजही करण्यात येत आहेत. या प्रयत्नांमध्ये मुलांबरोबरच मुलींच्या साक्षरतेचे प्रमाण वाढावे म्हणून विशेष प्रयत्न होतांना दिसतात जसे की, मुलींना मोफत बसेच पास, मोफत



वसतीगृहे इ. त्यामुळे महिलांच्या साक्षरतेचा आलेख निरंतर वाढत आहे. साक्षरतेमुळे महिलांच्या बुध्दीमत्तेचा विकास होत आहे. शिक्षणामुळे शिवाय त्यांना त्यांच्या अधिकारांचीही जाणीव अहे. शिक्षणामुळे महिलांना स्वत:च्या कुवतीची जाणीव होवून त्या प्रत्येक क्षेत्रात सक्षमतेने पुढे येत आहेत आणि यशस्वीपणे आपले काम करीत आहेत.

**आरक्षण धोरण व महिला सक्षमीकरण :**

राजकीय स्वरुपाच्या मार्गदर्शक तत्वांमध्ये सत्तेचे विकेंद्रीकरण करण्यासाठी पंचायत राज्यव्यवस्था स्थापन करण्याचे धोरण ठरविण्यात आले आहे. त्यानुसार भारतीय राज्यघटनेच्या ७३ व्या घटना दुरुस्तीनुसार देशात पंचायत राज्यव्यवस्था ही संकल्पना कार्यान्वित केल्या गेली. या घटना दुरुस्तीमुळे महिलांना जेल्हा परिषदा, पंचायत समिती व ग्रामपंचायतीमध्ये ३३ टक्के आरक्षण मिळाले. या घटना दुरुस्तीची सर्वात प्रथम अंमलबजावणी महाराष्ट्र शासनाने सुरु केली. याचा आधारावर केंद्रीय संसदेमध्ये व राज्य विधीमंडळामध्ये महिलांना ३३ टक्के आरक्षण मिळावे यासाठी विधेयक तयार केले होते, मात्र अनेक राजकीय पक्षांचा या विधेयकाला विरोध होता. अलिकडच्या काळात अनेक राज्य सरकारनी आपल्या राज्यात पंचायत स्तरावर महिलांना ५० टक्के आरक्षण दिले आहे. त्यामध्ये आसाम, आंध्रप्रदेश, बिहार, छत्तीसगड, गुजरात, हिमाचल प्रदेश, झारखंड, केरळ, कर्नाटक, मध्यप्रदेश, महाराष्ट्र, ओडीसा, राजस्थान, सिक्कीम, पश्चिम बंगाल या राज्यांचा समावेश आहे. महिला आरक्षण धोरणांच्या वरील तरतुदींमध्ये महिला सक्षमीकरणात निश्चितीच भर पडत आहे. पुरुष प्रधान संस्कृतीत कुवत आणि क्षमता असूनही अनेक महिला घराबाहेर पडू शकत नव्हत्या त्यांना या तरतुदींनी स्वत:ला सिध्द करुन दाखविण्यासाठी दालने दघडी



146

करुन दिली आहेत असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. पंचायतराज मधील महिला आरक्षण धोरणामुळे महिला समाजकारण व राजकारणात पुढे आल्या आणि वेगवेगळया क्षेत्रांमध्ये त्यांनीर वेगवेगळी कार्ये पार पाडली आहेत. उदा. दारुबंदी,हुंडाबंदी,महिला अत्याचाराविरुध्द बंड, महिला सक्षमीकरण त्याचप्रकारे सामाजिक स्तरावर वेगवेगळया प्रकारच्या संस्था, संघटना, परिषदा व शिबिर या माध्यमातून व स्त्री जनजागृती करण्याचे महान कार्यही महिलाच करीत आहेत.

अशाप्रकारे मुलभूत हक्क व मार्गदर्शक तत्वांच्या माध्यमातून महिलांना सक्षमक करण्यासाठी अनेक तरतुदी करण्यात आल्या आहेत. सर्वात महत्वाचे म्हणजे सार्वत्रिक प्रौढमताधिकाराचे तत्व स्विकारुन महिलांनाही मतदानाचा हक्क व राजकारणात सहभागी होण्याचा हक्क समप्रमाणात प्राप्त झाला आहे. वरील सर्व तरतुदींना व्यावहारीक आधार देण्यासाठी पं.नेहरुच्या पहिल्याच सरकारने महिलांसाठी अनेक कायदे केले. त्यात विशेष महत्वाचे म्हणजे विशेष विवाह कायदा १९५४, हिंदु विवाह कायदा १९५५, हिंदू दत्तक कायदा १९५६, स्त्रिची अनैतिक व्यापारबंदी १९५६, हुंडा बंदी कायदा १९६१ हे कायदे आहेत. त्याचबरोबर महिला उन्नतीसाठी अनेक स्त्रिचळवळी सुध्दा निर्माण झाल्यात व त्यांनी भारतीय स्त्रीला 'चुल आणि मूल' या चौकटीच्या बाहेर काढण्याचा प्रयत्न केला. आज अनेक महिला महत्वपूर्ण पदावर कार्यरत आहेत. किरण बेदी (प्रशासक),किरण मुजूमदार(उद्योजक),मेधा पाटकर (सामाजिक कार्यकर्त्या), सुनिता नारायण (पर्यावरण तज्ञ) ही यादी न संपणारी आहे शिवाय राजकारणातही महिलांचा सहभाग वाढत आहे अनेक राज्यात महिला मुख्यमंत्री राहील्या आहेत. तामीळनाडुमध्ये जयललीता,उत्तरप्रदेश मध्ये मायावती, राजस्थानमध्ये वसूंधरा राजे, पं.बंगाल मध्ये ममता बॅनर्जी, दिल्लीमध्ये शिला दिक्षीत इ.

महिलांचा मतदान करण्याच्या प्रमाणाचा आलेखही वाढता आहे. १९९१ मध्ये स्त्रीयांच्या मतदानाचे प्रमाण ५१.४ टक्के होते`



सन १९९[illegible] [illegible] निवडणूकात ५७.९ टक्के पर्यंत पोहचले. पंचायत राज व्यवस्थेतील महिला आरक्षण धोरणामुळे स्थानिक पातळीवरील महिलांच्या दर्जातही सुधारणा होत आहे. ग्रामीण भागातील अनेक महिला ग्राम पंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषद सदस्या बनल्या आहेत. अनेक महिला सरपंच व सभापती बनल्या आहेत. त्यामुळे महिलांना ग्रामविकास करण्याची व सोबतच नेतृत्व करण्याची संधीसुध्दा मिळाली आहे. प्रतिनिधीत्वाची हमी मिळाल्याने महिलांचे राजकीय सामाजिकरण होण्यास सुरुवात झाली आहे. राजकीय सामाजिकरण शिक्षणाचा वाढता प्रसार आणि मुलभूत हक्कांची हमी यामुळे महिला सबलीकरणाचा मार्ग मोकळा झाला आहे. साक्षरता प्रसार व पंचायतराज मधील आरक्षणामुळे महिलांचा राजकारण व समाज कारणातील सहभागीता वाढत आहे. दारुबंदी, हूंडाबंदी, जाचक रुढी परंपराविरुध्दचा लढा अशा अनेक बाबींनी त्यातुन जन्म घेतला आहे. राजकारण व समाजकारणातील महिलांची सहभागीता भारताच्या सामाजिक व राजकीय आधुनिकरणाचा एक भाग आहे.

संदर्भ सूची:

१) पाटील, डॉ. वा.भा., पंचायत राज, प्रशांत पब्लिकेशन, जळगांव,२००९

२) गवई डॉ. सुभाष, चव्हाण, डॉ. शांताराम : भारतीय संविधानातील तरतुदी आणि स्थानिक स्वराज्य संस्था, प्रशांत
पब्लिकेशन जळगांव, २०१७.

३) सिंह, राजबाला, मानवाधिकार और महिलाएँ, अविष्कार पब्लिशर्स, डिस्ट्रीब्युटर्स, जयपुर,२००६.

४) आंबेडकर डॉ. भिमराव रामजी, भारताचे संविधान भारत सरकार विधी व न्याय मंत्रालय, सारनाथ प्रकाशन बुक
डेपो, परभणी, डिसेंबर २०१२.

५) जैन डॉ. पृथ्वीराज, फडिया, डॉ. बी.एल. भारतीय शासन एवं राजनिती, साहित्य भवन पब्लिकेशन, आगरा,
२०१०.

६) देशमुख डॉ. अलका, भारतीय शासन आणि राजकारण, श्री साईनाथ प्रकाशन, नागपुर, २००३.

७) **Kashyap, Subhash C, - Our Constitution, National Book Trust, India, १९९४.**



147